महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गट ब संवर्गातील उमेदवारांच्या परिवीक्षाधिन प्रशिक्षण कालावधीकरिता ५ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांकः एमव्हीडी-०७१७/प्र.क्र.१८५/परि-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ सप्टेंबर, २०१७.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग टिआरएन२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि. २०.०१.२०१४.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पदनि२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि. २०.०२.२०१६.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पदनि२०१६/प्र.क्र.७/१६/आ.पु.क., दि. २७.०१.२०१७.
४) शासन परिपत्रक क्र. टिआरएन-२०१७/प्र.क्र.४७/१७/सीपीटीपी, दि. २६.०७.२०१७.
५) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टिआरएन-०६१७/प्र.क्र.६८/सीपीटीपी-ब, दिनांक ०५.०७.२०१७.
६) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टिआरएन-०६१७/प्र.क्र.६८/सीपीटीबी-ब, दिनांक १७.०७.२०१७
७) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टिआरएन-२०१७/प्र.क्र.३८/सीपीटीपी-अ, दिनांक १९.०७.२०१७

राज्यसेवा मुख्य परिक्षा-२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (गट ब) या संवर्गामध्ये एका उमेदवाराची शिफारस केली आहे. सदर उमेदवाराचे वनामती, नागपूर या संस्थेमध्ये दि. ०१.०८.२०१७ पासून सामान्य प्रशासन विभागामार्फत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण -४ सुरु करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे गतवर्षी एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम -३ (२०१६) च्या प्रशिक्षणास रुजु होण्यास मुदतवाढ दिलेले सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (गट ब) संवर्गातील ४ उमेदवारांचे सुद्धा वनामती, नागपूर या संस्थेमध्ये दि. ०१.०८.२०१७ पासून सामान्य प्रशासन विभागामार्फत एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण -४ सुरु करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने परिवहन विभागातील उपरोक्त नमुद ५ उमेदवारांचे प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी (दोन वर्षासाठी) अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

राज्यसेवा मुख्य परिक्षा २०१६ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, (गट ब) संवर्गासाठी रुपये ९३००-३४८०० (ग्रेड पे रु. ४६००) या वेतनश्रेणीत ५ अधिसंख्य पदे दि. ०१.०८.२०१७ ते दि. ३१.०७.२०१९ पर्यंत दोन वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहेत.

३. संदर्भ क्र. ३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २६.०७.२०१७ रोजीच्या परिपत्रकात निर्देशित केल्यानुसार संबंधित परिवीक्षाधीन अधिका-यांच्या प्रत्यक्ष उपस्थित उमेदवारांच्या संख्येनुसार वेतनापोटी अग्रिम निधी दि. ०१.०८.२०१७ ते १०.०९.२०१७ या कालावधीकरीता वनामती नागपूर या प्रशिक्षण संस्थेस व दि. ११.०९.२०१७ ते दि. २९.१२.२०१७ पर्यंत चा अग्रिम निधी महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक या प्रशिक्षण संस्थेला उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी करावी.

४. परिवीक्षाधीन अधिकारी संबंधित विभागाकडे रुजु झाल्यानंतर त्यांना विभागामार्फत नियमित वेतन अदा करण्यात येईल. तसेच आधीच्या कालावधीत अदा केलेले ठोक वेतन आणि नियमित वेतन यातील फरकाची रक्कम देखील एक रकमी अदा करण्यात येईल.

५. परिवीक्षाधीन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गट ब यांच्या अधिसंख्य पदावर होणारा खर्च " मागणी क्र. बी-३, मुख्य लेखाशिर्ष २०१४, वाहनावरील कर (०१) ००१, संचालन व प्रशासन (२०४१००१८) ०१ वेतन (योजनेतर) (दत्तमत)" या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा. तसेच सदर बाबीसाठी आवश्यक असल्यास अतिरिक्त रकमेसाठी सुधारीत अंदाजपत्रकामाध्ये पुरक मागणीचा प्रस्ताव सादर करावा.

६. वित्त विभागाने संदर्भाधिन दि. २०.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०९१६१६५११०३९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.09.16 16:40:45 +05'30'

(द.ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.महालेखापाल, १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

२. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

६.जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर.

७. वित्त विभाग (कार्यासन क्र. व्यय ८ व वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.

८. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड, धरमपेठ,नागपूर

९. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

१०. कक्ष अधिकारी (सीपीटीपी अ व ब)

११. निवडनस्ती, परिवहन-४.